Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 69 – 74

DOI: 10.5281/zenodo.8338354

Original Research Article

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शैक्षणिक संस्थांचे योगदान

प्रा. डॉ. नरेंद्र बाळासाहेब देशमुख

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता. जि. लातूर ४१३५३१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: deshnb@gmail.com

Received: 12 September, 2023 | Accepted: 13 September, 2023 | Published: 15 September, 2023

**महत्वाचे शब्द:** हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, शैक्षणिक संस्था, हैदराबाद संस्थान, इस्लाम धर्म, निजाम राजवट, आर्य समाज

हैदराबादच्या निजाम सरकारचे उत्पन्न वार्षिक २६ कोटी रुपये होते त्याबरोबरच संस्थानाचा शेकडा ४२ टक्के भाग जहागीरदाराने व्यापलेला होता. सर्व जहागीरदारांची संख्या ५० लाखांवर होती. त्यांचे वार्षिक उत्पन्न ४ कोटी रुपयांच्या आयात होते. लहान मोठ्या जहागीरदारांची संख्या १९६७ होती. मराठवाड्यात सावकारशाही ही खेडोपाडी पसरलेली होती. त्यांना लायसन्स घेण्याचे बंधन नव्हते. सर्व संस्थानात मुस्लिम सावकारांची संख्या ३१०६ होती. मराठवाड्यात सावकारांची संख्या २५८१ होते; परंतु शिक्षणावर मात्र या काळात फारसा खर्च केला जात नसे.

**उद्देश:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढील प्रमाणे उद्देश निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. शैक्षणिक संस्थाचे योगदान समजून घेणे.

२. आर्य समाजाच्या कार्याचा आढावा घेणे.

३. उत्तरार्ध जाणुन घेऊन, हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेच्या कार्याचा अभ्यास करणे.

## गृहित कृत्ये

१. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शैक्षणिक संस्था पुर्वार्धात व उत्तरार्धात वेगवेगळ्या होत्या.

२. आर्य समाजाचे बहुआयामी कार्य आहे.

३. उत्तरार्धात मराठवाड्याच्या शैक्षणिक इतिहासात नवे पर्व उदयास आले.

**तथ्य संकलन:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण**

**अध्ययन व अध्यापन**

उस्मानिया विद्यापीठात मुस्लिम विद्यार्थ्यांना इस्लाम धर्माचे शिक्षण दिले जाई. त्या विषयाला दिनियात (धर्मशास्त्र) असे म्हणत. या विषयाचे प्रोफेसर व विभागप्रमुख्य म्हणून मौलवी मजहरुल हसन जिलानी होते. पैगंबराच्या जन्मदिवसाला मिलादुन्नबी या नावाने आपल्या भाषणातून मुस्लिम विद्यार्थ्यांच्या उदासिनतेची व आत्मसंतुष्टतेची निर्भत्सना केली व देशात जोपर्यंत २२ कोटी गोबर परस्त (गोयमाचे उपासक) आहे तोपर्यंत मुस्लिम युवकांनी स्वस्थ बसू नये, असे प्रक्षोभक भाषण केले, विद्यापीठात सर्व शिक्षणाचे माध्यम उर्दु होते. आरबी, फारसी व उर्दू या विषयाचे खास विभाग होते. प्रत्येक विभागासाठी विभागप्रमुखांची नेमणूक करण्यात आली होती. विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणाची व्यवस्था होती; परंतु ज्या तीन भाषिक प्रदेशांची मिळून हैदराबाद संस्थान बनले होते त्या मराठी, कानडी आणि तेलगू या भाषांची खास विभाग होते. प्रत्येक विभागासाठी विभागप्रमुखाची नेमणूक करण्यात आली होती.

विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणाची व्यवस्था होती; परंतु ज्या तीन भाषिक प्रदेशांची मिळून हैदराबाद संस्थान बनले होते त्या मराठी, कानडी आणि तेलगू या भाषांची व संस्कृतीची जेवढी उपेक्षा करता येईल तेवढी चालू होती. सर्व मुस्लिम विद्यार्थ्यांना ईस्लाम धर्माचे शिक्षण देणारी दीनियात या नावाचा विषय आवश्यक होता, परंतू हिंदू विद्यार्थ्यांना मात्र त्यांच्या धर्माचे शिक्षण मिळेल, अशी व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. म्हणजेच ईस्लाम खेरीज अन्य कोणत्याच धर्मासाठी ही व्यवस्था नव्हती. बिगर-मुस्लिम विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा नितीशास्त्राचा तास घेतला जात असे. नितीशास्त्र या विषयात क्रमिक पुस्तके असत. नीतिशास्त्राला आखलाकियात असे म्हणत. या क्रमिक पुस्तकात मुस्लिमांचीच जे धडे असत ती मुस्लिम आणि ख्रिश्चन लेखकांनीच लिहिलेली असत. त्यामुळे नैतिक आदर्शाची उदाहरणे म्हणजे मुस्लिमांचीच दिली जात असत. नीतिशास्त्राच्या नावावर मुस्लिम पुराणकथा दिलेल्या असत त्यामुळे इतर विद्यार्थ्यांच्या मनात तीव्र स्वरुपांची नाराजी आणि शिक्षणाबद्दल अनादर निर्माण झाला होता.

निजाम सरकारच्या विरोधात खाजगी शिक्षणसंस्था स्थापन करणे हे सामान्य गोष्ट नव्हती. निजामच्या गस्ती विरोधात हालचाल करणे म्हणजे घरादारावर तुळशीपात्र ठेवणे, कारण अशा प्रकारच्या संस्था स्थापन करुन त्या चालवणे म्हणजे निजाम सरकारचा हा उघड उघड राजद्रोह होता. उद्या कोणते संकट ओढवेल, आपल्या घरादारांची कधी राख-रांगोळी होईल याचा भरवसा नव्हता. जातीच्या दुराभिमानाने पछाडलेल्या निजामी अधिका-यांकडून फटक्याची शिक्षा घेऊन अत्यंत हाल होत असत. कधी कधी अंधार कोठडीत शिक्षा भोगावी लागत असे, या धोरणाचा परिणाम मराठवाड्याच्या शिक्षणावर दूरगामी आणि निर्णायक स्वरुपाचा झाला त्यामुळे इ.स. १९२०-२१ पर्यंत या भागात खाजगी शिक्षण संस्था जन्मास येऊ शकल्या नाहीत.

**आर्य समाजाची कामगिरी**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात आर्य समाजाचे योगदान हे जसे वैशिष्ट्यपूर्ण होते त्याप्रमाणेच हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील आर्य समाजाच्या प्रभावी कार्याने व स्वामी दयानंद सरस्वतीच्या अष्टपैलू नेतृत्वाने देशात ज्याप्रमाणे जागृती घडन आली व राष्ट्रवादी चळवळीला अनुकूल वातावरण निर्माण झाले त्याप्रमाणे हैदराबाद संस्थानातील निजाम राजवटीच्या लोकांनी संघटित अस्मिता जागृत करण्यावर भर दिला. आर्य समाजाचा जन्म हा ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या काळात भारतीय संस्कृतीवर होणा-या सांस्कृतिक साम्राज्यवादाविरुध्द झाला. शोषित जनतेचा हा आगळा-वेगळा लढा होत. निजाम राजवटीमध्ये भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य त्याबरोबरच धार्मिक भावनेवर जे आघात केले जात होते सण, उत्सव साजरे करता येत नव्हते. धार्मिक आत्याचारातही कहर केला जात होता. त्यामुळे लोकांत पराधिनतेची व नैराश्याची भावना पसरली होती, अंगावर रोमांच उभे राहावे यासारखी पाशवी अत्याचाराने जुलूम कृत्य केली जात होती. शेकडा वीस टक्के लोकांचे ऐंशी टक्के लोकांवर वर्चस्व होते.

इ.स. १८९१ मध्ये हैदराबाद राज्यात आर्यसमाजाची स्थापना सर्वप्रथम बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर या गावी झाली. त्यावेळी आर्य समाजाचा मुख्य उद्देश हा धर्म आणि सुधारणा करणे हा होता. आर्य समाजाने निरंतर असा संघर्ष केल्यामुळे या राजवटीविरुध्द आंदोलनाची गती वृध्दिंगत झाली; परंतु त्याबरोबरच शैक्षणिक संस्थाच्या स्थापनेला अनुकूल वातावरण निर्माण झाले. आर्य समाजामुळे या भागात गुरूकुल स्थापन करण्यात आले. त्याचा प्रसार वाढत केला. अंबाजोगाई, हिंगोली येथे त्यांनी कॅम्प सुरु केले. इ.स. १८९५ मध्ये लोकमान्य टिकांनी सुरु केलेल्या गणेश उत्सवाची सुरुवात हैदराबाद शहरात सुरु झाली. आर्य समाजाच्या पेरणेने ग्रंथालय, वाचनालय, व्यायामशाळा, आखाडे अस्तित्त्वात आली होती. यांच्या स्थापनेसाठी परवानगी घेतली जात नव्हते. इ.स. १९०७ मध्ये हैदराबाद येथे विवेक वर्धिनी विद्यालय व इ.स. १९०८ मध्ये गुलबर्गा येथे नूतन विद्यालय सुरु झाले. संत पाचलेगावकर महाराजांचा अध्यात्मिक क्षेत्रातील व्यासंग हा दांडगा होता. ते उत्कृष्ट वक्तेही होते. त्यांनी ठिकठिकाणी मंदिरे कायम केली, वाचनालये सुरु केली.

साक्षरतेचे वर्ग सुरु झाले, अस्पृश्यता निवारण व व्यायामशाळा सुरु झाल्या. उदाहरणात बीड जिल्ह्यात आर्य समाजाच्या वतीने वाचनालय व व्यायामशाळा सुरु झाल्या. उस्मानाबाद जिल्ह्यातही वाचनालयाची स्थापना आर्य समाजाने केली. मराठवाड्यातील सर्वात जुने व पहिले वाचनालय परभणी येथे सुरु झाले. त्याचे नाव गणेश वाचनालय हे होते. कारण १९०१ मध्ये गणेश उत्सवाच्या काळात हे वाचनालय सुरु झाले. त्यानंतर हिंगोली, कळमनुरी, वसमत, चारढाणा व अन्यत्र वाचनालय सुरु झाली. या क्षेत्रात आर्य समाजाने फार मोठी कामगिरी केली व त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेला पोषक आणि अनुकूल वातावरण निर्माण झाले व पुढील काळात त्यांना मूर्त स्वरुप देण्यात आले.

**लोकमान्य टिळकांची प्रेरणा**

लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्री कार्यक्रमाने हैदराबाद संस्थानात उत्साह निर्माण केला. इ.स. १८९५ मध्ये लोकमान्यांनी एक जीनिंग फॅक्टरी श्री विद्देस यांच्यासाठी कायम केली होती. ते स्वत: १९०० मध्ये लातूरला आले. १९०१ मध्ये औरंगाबादला गेले तसेच १९०५, १९०६ व १९०७ ही कॉंग्रेसची अधिवेशने वादळी ठरली. या काळात

स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ भरात आली होती. लोकमान्य टिकांच्या प्रेरणेने अनेक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक कार्यात पुढाकार घेतला.

त्यात राघवेंद्र शर्मा, पंडित सातवळेकर, दत्तो अण्णाजी तळजापूर, लक्ष्मणराव फाटक, बॅरिस्टर श्रीधरराव नाईक, बॅरिस्टर केशवराव कोरटकर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी टिळकांपासून प्रेरणा घेऊन विविध कार्यात पुढाकार घेतला. हैदराबाद व्यायामशाळा सुरु झाली. त्या वेळी आखाडे आणि व्यायामशाळा यांना देशभक्तीच्या प्रेरक केंद्राचे स्वरुप प्राप्त झाले होते. त्यांनी स्वदेशीच्या कल्पनेचा स्वीकार करुन भरजरी कपड्याचा त्याग करुन स्वदेशीचे वृत्त घेतले.

**हिप्परग्याची पहिली राष्ट्रीय शाळा**

जून १९२१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्याच्या एका उजाड माळरानावर हिप्परगा येथे व्यंकटराव देशमुख, अनंतराव काका, विश्वनाथ रामचंद्र होनाळकर, आनंदराव आप्पाराव पाटील यांच्या सहकार्यातून या शाळेची स्थापना झाली. व्यंकटराव व अनंतराव हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी, टिळकांनी देशात असंतोषाचा आग्नी पेटविला होता. त्यांचा आदर्श डोळयांसमोर ठेवून त्यांनी ही शाळा सुरु केली. लोकमान्य टिळकांचे १ ऑगस्ट १९२० मध्ये देहावसान झाले व १९२१ मध्ये हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेचा जन्म झाला. विजयदशमीच्या मुहूर्तावर विश्वनाथ रामचंद्र होनाळकरांच्या वाड्यात तिसरी आणि चौथीचे वर्ग उघडण्यात आले. शाळेचे नाव प्रायव्हेट स्कूल होते तर या शाळेला अनतराव काका व गणेशसिंग मास्तर हे दोन शिक्षक होते.

निजाम राजवटीत परवानगी न घेता अशा प्रकारची शाळा सुरु करणे ही सामान्य गोष्ट नव्हती. कारण असा प्रयत्न शाळेच्या संस्थापकांनी केला. अनंतराव व गोपाळरावांनी सर्व ईस्टेट शाळेच्या नावाने दान केली. घरासह घरची सगळी मालमत्ता विकून ही राष्ट्रीय शाळा उघडली. या शाळेमुळे परदास्याच्या अंधकारात हिप्परग्याच्या माळरानावरुन एक तेजस्वी प्रकाश ज्योत तेवत होता. या प्रकाशांनी आपल्या भावी पिढ्यांच्या जीवनातील अंधार दूर केला. स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला. निजाम राजवटीत निसत्व जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्य देवतेच्या स्थंडिलावर बलिदान देण्याची पिढी तयार झाली. योगायोगाने या शाळेत स्वामी रामानंद तीर्थ हे मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. ते पदवीधर असून टिळक विद्यापीठाचे फेलो होते. वयाच्या विसाव्या वर्षी बाबासाहेब परांजपे हे बी.एस्सी. झालेले असामान्य बुध्दिमत्तेचे विज्ञान शिक्षक होते. वयाच्या वीसाव्या वर्षी पुढील शिक्षणासाठी जर्मनीस जाण्याऐवजी देशप्रेमाने ध्येयवादाने भारावलेल्या बाबासाहेब परांजपे यांनी हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेत तरुण पिढी घडविण्याचे वृत्त हाती घेतले. या शाळेच्या संदर्भात स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या आत्मचरित्रात ज्या आठवणी लिहिल्या आहेत त्यात ते लिहितात की.... ईश्वरी योजना ही अगम्य असते. एखाद्या दिवशी मी वर्गात काही मुलांना घेऊन काही शिकवत बसेन याची मला स्वप्नातसुध्दा कल्पना नव्हती पण १९२९ च्या जून महिन्यात ग्रामीण भारताच्या एका कानाकोप-यात चाललेल्या एका राष्ट्रीय शिक्षण संस्थेचा प्रमुख म्हणून प्रत्यक्षात काम करु लागले हे सत्य होते.... स्वामी रामानंद तीर्थ यांना पगार एकूण ५०/- रुपये मिळत; परंतु शेवटपर्यंत या पगाराचा पैसा त्यांनी उचलला नाही. मुख्याध्यापक असूनही दररोज गावात चार घरे भिक्षा मागून नरसोबाच्या मंदिरात बसून ते अन्न सेवन करीत. जेवणा आधी मंदिरात कोणी दिसला तर आपल्या

भिक्षेतला अर्धा वाटा त्याला ते देत आणि राहिलेले चार घास प्रसन्न चित्ताने खात. कारण त्यांच्या ठिकाणी टिळकांचा खंबीरपणा, गांधीजींची अहिंसा आणि साने गुरुजींची मुले म्हणजे उमलणारी फुले ही वृत्ती होती. मातृ-हृदय हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता. वि.स. खांडेकरांनी हिप्परग्याचे राष्ट्रीय शाळेवर किर्लोस्कर मासिकेत त्या वेळी लेख लिहून माळरानावरील फुलबाग या अर्थाने या शाळेचा गौरव केला. या हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेतून स्वामी रामानंद तीर्थ, देवीसिंग चौहान, बाबासाहेब परांजपे, विश्वनाथराव दादा हाराळकर, राघवेंद्रजी दिवान, बेथुजी गुरुजी, श्रीनिवास अलंकार यासारख्यांनी हैदराबादच्या स्वातंत्र्य लढ्याचे रणसिंग फुंकले. स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने प्रभावीत झालेली नवी पिढी उदयास आली. त्या त्या लढ्याचे समर्थ नेतृत्व स्वीकारुन अनेकांनी या लढ्यात स्वत:ला झोकून दिले. ही सर्व किमया केवळ हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेतून घडून आली.

हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेनतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९३५ मध्ये अंबाजोगाई येथे योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना करुन योगेश्वरी विद्यालय सुरु केले. हे विद्यालय सुरुवातीला योगेश्वरी देवीच्या मंदिरात सुरु करण्यात आल्यामुळे कदाचित या विद्यालयाला योगेश्वरी हे नांव देण्यात आले असावे. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्थापनेमुळे मराठवाड्याच्या शैक्षणिक इतिहासात नवे पर्व उदयास आले व त्यातूनच अनेकांनी निजाम राजवटीविरुध्द चळवळी सुरु केल्या.

शिक्षणाचा या भागात प्रसार झाला. निजामाची कडवी नजर या शिक्षणसंस्थेवर सुरुवातीपासूनच होती. सुरुवातीस कसल्याही प्रकारचे अनुदान नसताना ही संस्था सुरु करुन या परिसरात शिक्षणाचा हा ज्ञान यज्ञ सुरु करण्यात आला होता. या शैक्षणिक संस्थामुळे महाराष्ट्र परिषद, स्टेट काँग्रेस, वंदेमातरम्, जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह व पोलिस ॲक्शन या चळवळींना व आंदोलनाला गती देण्यात, दिशा दाखविण्यात या परिसरातील शैक्षणिक संस्थांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण होते. निजाम राजवटीमध्ये उर्दू भाषेची सक्ती करण्यात आली होती; परंतु मराठवाड्यात खाजगी शैक्षणिक संस्था सुरु झाल्यामुळे लोकांना मातृभाषेतून शिक्षण मिळू लागले. बहुजन समाजात जागृती घडून आली. या स्वातंत्र्य लढ्यात हा वर्गही सक्रिय सहभागी झाला म्हणूनच १७ सप्टेंबर १९४८ ला निजाम राजवटीची कवच कुंडले गाढून हैदराबाद संस्थान सुरु झाले. मराठवाडा स्वतंत्र झाला. देशाला ख-या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले.

**निष्कर्ष**

१. इस्लाम धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी दिनयात (धर्मशास्त्र) विषय आवश्यक होता मात्र अन्य धर्मातील विद्यार्थ्यांसाठी अशी व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. शिक्षणाचे माध्यम ऊर्दू होते.

२. निजाम सरकारच्या विरोधात खाजगी शिक्षण संस्था स्थापन करणे फार अवघड होते. तरीही आर्य समाजाच्या कामगीरीमुळे शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेला अनुकूल वातावरण निर्माण झाले.

३. खाजगी संस्था स्थापन झाल्यामुळे लोकांना मातृभाषेतुन शिक्षण मिळू लागले.

**संदर्भसूची**

१. स्वामी रामानंद तीर्थ - अनंत भालेराव

२. कर्मयोगी संन्याशी - नरेंद्र चपळगावकर

३. संस्थानी माणसं – न्या. नरेंद्र चपळगावकर

४. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम - वसंत ब. पोतदार

**५.** बखर संस्थानांची - सुनीत पोतनीस